सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १४२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २८ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## हे मराठीचं प्रेम नाही, तर महापालिका निवडणुका... देवेंद्र फडणवीसांचा उद्धव ठाकरेंवर निशाणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २८ मुंबई**

मी कुणासमोर प्रश्नचिन्ह निर्माण करणार नाही. महापालिका निवडणुका नसत्या तर कदाचित या निर्णयाला इतका वेगळा विरोध झाला नसता. राज ठाकरेंची भूमिका आणि आमची भूमिका वेगळी आहे. सगळ्याच भूमिका सारख्या असत्या तर एका पक्षात राहिलो असतो. भूमिका वेगळी असू शकते. परंतु उद्धव ठाकरेंनी जर एखादा रिपोर्ट स्वीकारला आणि त्याविरोधातच आता बोलतायेत. याचा अर्थ राजकीय आहे. या राज्यात माशेलकर, मुणगेकर यांच्यासारख्या लोकांवर प्रश्नचिन्ह लावता येईल का? देवेंद्र फडणवीसांना राजकारण करायचे आहे असं बोला, पण तज्ज्ञांनी एखादा रिपोर्ट दिला. तो तुम्ही मुख्यमंत्री असताना स्वीकारला आणि आता त्याउलट जात आहात याचा अर्थ हे मराठीचे प्रेम नाही तर हे राजकीय आहे असं सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात मराठीची सक्ती आहे, हिंदी सक्ती नाही. हिंदी पर्यायी भाषा आहे. हिंदी किंवा अन्य कुठलीही भारतीय भाषा शिकता येईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात त्रिभाषा सूत्र दिले आहे. हे सूत्र आपण स्वीकारले आहे. जेव्हा २०२० साली हे धोरण आले तेव्हा महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार होते. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना या धोरणावर अभ्यास करण्यासाठी कमिटी तयार केली. त्याचे अध्यक्ष माशेलकर होते. त्यात डॉ. मुणगेकर, सुखदेव थोरात यांच्यासारखी प्रमुख १८ मंडळी होती. या सर्वांनी एक रिपोर्ट तयार केला आणि तो २०२१ साली उद्धव ठाकरे सरकारला दिला. तो रिपोर्ट तेव्हाच्या सरकारने स्वीकारला. हा तोच रिपोर्ट आहे ज्यात त्रिभाषा सूत्र सांगितले आहे आणि त्यात स्पष्टपणे मराठीसोबत इंग्रजी आणि हिंदी सक्ती करा असं अहवालात म्हटले आहे. त्यावेळच्या बातम्या पाहा, वेगवेगळ्या भाषा शिकायला हव्यात असं उद्धव ठाकरे म्हणाले. आता माशेलकर, मुणगेकर, सुखदेव थोरात यांना महाराष्ट्रद्रोही ठरवणार आहात का? असा सवाल त्यांनी विचारला.

तसेच काही गोष्टी आपण समजून घेतल्या पाहिजेत. ही एक प्रक्रिया आहे त्यात आपले विद्यार्थी पुढे कसे गेले पाहिजे त्यादृष्टीने तयार केलेले त्रिभाषा सूत्र आहे. विद्यार्थ्यांचे जे ब्रेन आहे ज्यात सर्वात जास्त भाषा शिकवण्याचा काळ कधी आहे याचा अभ्यास करून त्यावेळी या भाषा मुलांना शिकवल्या तर अधिक भाषा ते शिकू शकतात हे समोर आले आहे. हा आमच्यासाठी प्रतिष्ठेचा विषय नाही. हिंदी शिकली पाहिजे असे नाही कुठलीही भाषा शिका. हिंदी सक्तीचा हा प्रश्न नाही. हिंदी भाषेला विरोध आहे. या लोकांचा विरोध हिंदीला आहे. भारतात तुम्हाला इंग्रजी चालते, इंग्रजीला विरोध नाही. हिंदीला विरोध आहे. हा विरोधाभास आहे. मराठी आणि हिंदी स्पर्धा झाली तर मराठीलाच प्राधान्य आहे. मराठीपुढे इतर कुठलीही भाषा नाही हे आमचे मत आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

## आता मोबाइल व्हेरिफिकेशनही मोफत नाही; लवकरच येणार नियम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

दूरसंचार विभागाने मोबाईल फसवणूक रोखण्यासाठी सायबर सुरक्षा नियमात बदल करण्याचा प्रस्ताव दिला आहे. नव्या नियमांत मोबाईल व्हेरिफिकेशनसाठी एक प्लॅटफॉर्म तयार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. यात व्हेरिफिकेशनसाठी सरकारी एजन्सी आणि खासगी कंपन्यांना नंबर शुल्क द्यावे लागेल. हा खर्च कंपन्या घेणार की युजर्सवर टाकणार याबाबत अजून निश्चित नाही.



२४ जून रोजी फाईल करण्यात आलेल्या सायबर सुरक्षा नियमांच्या नवीन ड्राफ्टनुसार फोन नंबर व्हेरिफिकेशनसाठी एक नवीन प्लॅटफॉर्म तयार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. ज्यांच्याकडे कस्टमर व्हेरिफिकेशनचे लायसन आहे त्या सगळ्यांना या प्लॅटफॉर्ममध्ये सहभागी करून घेण्याचा विचार आहे.

या नियमांत म्हटले आहे की एंटिटिज राज्य किंवा केंद्र सरकारद्वारे अधिकृत असेल तर प्रति फोन नंबर व्हेरिफिकेशनसाठी १.५ रुपये चार्ज केले जातील. दुसऱ्या किंवा खासगी एंटिटीजद्वारे प्रति नंबरची रिक्वेस्टसाठी ३ रुपये शुल्क आकारले जाईल. पण शुल्क कोण देईल याबाबत अजून तरी काही निश्चित नाही. तरीही हे पैसे ग्राहकांनाच द्यावे लागतील याची दाट शक्यता आहे.

## ८ आदिवासी जिल्ह्यांत दुसऱ्यांदा 'आरक्षण' व 'बिंदुनामावली' : महसूल मंत्री बावनकुळे

### अमरावती, वर्धा, नागपुरात आरक्षण केव्हा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २८ अमरावती**

राज्यात आदिवासी बहुल असलेल्या यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, नाशिक, धुळे, पालघर, नंदुरबार व रायगड या आठ जिल्ह्यांत दुसऱ्यांदा जिल्हास्तरीय गट 'क' व गट 'ड' संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्यासाठी 'सुधारित आरक्षण व बिंदुनामावली' लवकरच निश्चित होणार आहे. यासंदर्भात बुधवार, २५ जून रोजी मंत्रालयात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली आहे.

आदिवासी बहुल आठ जिल्ह्यांमध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या (एसईबीसी) १० टक्के आरक्षणासह सुधारित आरक्षण व बिंदूनामावली विहित करण्याच्या दृष्टीने शासनाला उपाययोजना सुचविणे आणि मंत्रिमंडळास अहवाल सादर करण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेत मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे. या समितीच्या बैठका जवळपास पार पडल्या असून लवकरच 'एसईबीसी' प्रवर्गाला आदिवासी बहुल आठ जिल्ह्यांत गट 'क' व गट 'ड' भरतीत १० टक्के आरक्षण मिळण्याची शक्यता बळावली आहे.



### अमरावती, वर्धा, नागपुरात आरक्षण केव्हा?

अनुसूचित क्षेत्रात मोडणाऱ्या या आठ जिल्ह्यात 'एसईबीसी' प्रवर्गाची लोकसंख्या १० टक्क्यांपेक्षा कमी आहे. तरीही दहा टक्के आरक्षण चालू ठेवण्यात आले आहे. असे असताना मंत्रिमंडळ उपसमिती 'एसईबीसी'करिता अभ्यास करीत आहे. मात्र वर्धा, जळगाव, गोंदिया, अमरावती, नागपूर, भंडारा, हिंगोली, नांदेड, अहमदनगर या जिल्ह्यात आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात असताना येथे त्या प्रमाणात आरक्षण कधी मिळणार, असा सवाल निवृत्त केंद्रीय सनदी अधिकारी एकनाथ भोये यांनी व्यक्त केला आहे.

## मुंबई महापालिकेचा महापौर महायुतीचा होणार

### संजय राऊत यांच्या बुद्धिमतेची चाचणी तिसरीत करावी लागेल : आशिष शेलार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

संजय राऊत यांच्या बुद्धिमतेची चाचणी तिसरीत करावी लागेल. हिंदीबाबतची कार्यवाही याबाबतची कार्यवाही उद्धव ठाकरे यांच्या काळात झाली आहे, संजय राऊत कितीही वाचवत असले तरी आता उद्धव ठाकरे पळ काढू शकत नाही, अशी टीका मंत्री आशिष शेलार यांनी कोल्हापूरमध्ये केली. आशिष शेलार म्हणाले की, कोण काय मोर्चा काढतंय हा त्यांना




अधिकार आहे. हे सर्व अनाकलनीय आहे कारण सर्व कागदपत्र जनतेच्या समोर असल्याचे ते म्हणाले. मराठीसाठी कट्टर पण विद्यार्थी हितासाठी कटिबद्ध असल्याचे ते म्हणाले. देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार, एकनाथ शिंदे हे तिघे एकच बोलत आहेत. आजची माझ्या महाराष्ट्रातील विद्यार्थी तीन भाषा शिकतात. जो विषयच नाही तो विषय काढला जात आहे. आम्ही विद्यार्थी हिताचं काम करतोय, त्यांना मोर्चा काढून हित वाटत असेल, मुंबई महापालिकेचा महापौर महायुतीचा होणार आहे असल्याचे शेलार यांनी सांगितले.


### पवार साहेब जातीचा रंग लावणे हे बरे नव्हे

पुणे रेल्वे स्टेशनच्या नामांतरावरून होत असलेल्या वादावर शेलार यांनी प्रतिक्रिया दिली. त्यांनी सांगितले की, शरद पवार हे ज्येष्ठ आहेत, पण आमच्यासारख्या लोकांनी सांगणं योग्य वाटत नाही. इतिहास बघून पुणे रेल्वे स्टेशनला नाव द्यावं यात जातीभेद कुठं आला इथं? पवार साहेब जातीचा रंग लावणे हे बरे नव्हे. शरद पवारांनी पुण्यात कोणती पगडी चालेल हा प्रश्न उपस्थित करणे याला जातीवाचक म्हणायचं का याचे उत्तर द्यावे लागेल, असे शेलार म्हणाले.

## देशपातळीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास शिकवला जाणार; मंत्री दादा भुसे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

महाराष्ट्रात सध्या हिंदी भाषा वाद सुरु आहे. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना हिंदी ही तिसरी भाषा म्हणून सक्तीने शिकवण्याचा सरकारचा निर्णय आहे. या पार्श्वभूमीवर ५ जुलैला ठाकरे बंधू एकत्र येत मोर्चा काढणार आहेत. आता हिंदी सक्तीच्या निर्णयावर शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. नाशिकमध्ये पत्रकार परिषद घेत दादा भुसे यांनी हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर भाष्य केले. तर दादा भुसे यांची पत्रकार परिषद सुरु असतानाच त्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा फोन आल्याने चर्चांना उधाण आले.



महाराष्ट्राचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी नागपूरमध्ये पत्रकार परिषद घेतली. या परिषदेत दादा भुसे म्हणाले की, मराठी आपली मातृभाषा आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. ही अभिमानाची बाब आहे. सर्व मराठी शाळांमध्ये मराठी शिकवणे अनिवार्य आहे. उइडए माध्यमाच्या शाळांमध्ये देशपातळीवर त्या त्या राज्याच्या भाषा शिकवणे बंधनकारक केले आहे, असे त्यांनी म्हटले. त्याचबरोबर लवकरच देशपातळीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास शिकवला जाईल असे त्यांनी सांगितली आहे.

## मुंबई बॉम्बस्फोटातील दहशतवादी साकिब नाचनचा दिल्लीत मृत्यू; भिवंडीत पोलिसांचा मोठा फौजफाटा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

कुविख्यात दहशतवादी म्हणून ओळखला जाणारा साकिब नाचण याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. भिवंडी तालुक्यातील पडघा-बोरिवली हे साकिब नाचण याचं मूळगाव आहे. त्यानंतर, बोरिवली आणि पडघा या दोन्ही ठिकाणी २०० हून अधिक पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून गावात येणाऱ्या प्रत्येक वाहनांची तपासणी सुरू केली आहे.

मुंबई सिरीयल बॉम्ब ब्लास्टमध्ये साकीब नाचन हा मुख्य आरोपी होता. त्यानंतर ISISI मोड्युलमध्ये डिसेंबर २०२३ मध्ये NIA ने पुन्हा त्याला अटक केली होती. दिल्ली येथील तिहार जेलमध्ये ठेवण्यात आले होते. मात्र, तिथे ब्रेन स्टॉक आल्याने पुढील उपचारसाठी साबिकला दीनदयाल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. साकिब नाचन याचा मृतदेह भिवंडी येथील बोरवली गावात आणण्यात येणार आहे, त्यामुळे कोणताही कायदा सुव्यवस्था बिघडू नये यासाठी मोठा पोलीस फौजफाटा येथे तैनात करण्यात आला आहे.

भिवंडी नाशिक हायवेवर पडघा-बोरिवली गाव हे स्वतंत्र मुस्लिम बहुल राष्ट्र घोषित करण्यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्न सुरु असल्याचा धक्कादायक खुलासा राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या छाप्यातून




समोर आला आहे. या गावाला सीरियासारख्या भूमीत रूपांतरित करण्याची योजना आखण्यात आल्याचं एनआएचं म्हणणं आहे आणि ही देशविघातक कृत्य कुठे सुरु आहे, तर भारताची आर्थिक आणि महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहराच्या वेशीवर, अवघ्या ५० किमी अंतरावर. महाराष्ट्र आयसीसच्या दहशतवादी मॉड्यूलवर छाप्यादरम्यान एनआयएनं मोठ्या प्रमाणात बेहिशेबी रोकड, बंदुक, धारदार शस्त्रे, गुन्ह्याची कागदपत्रं, स्मार्टफोन आणि इतर डिजिटल उपकरणं जप्त केली आहेत. काही जणांना ताब्यात घेतलं आहे. यातलचं एक मुख्य नाव म्हणजे साकीब नाचन. जो गेल्यावेळी यंत्रणांच्या हाती लागला नव्हता. साकीब स्वत:ला खलिफा म्हणजेच अल्लाहाचा उत्तराधिकारी समजत होता. त्याने पद्धतशीरपणे इसिसशी संबंधित एक-एक गोष्टी गेल्या अनेक वर्षांपासून करायला सुरुवात केली होती.

### मुंबई बॉम्बस्फोटात सहभाग

मुंबईतल्या तीन बॉंबस्फोटांप्रकरणी २००२-२००३ दरम्यान मध्ये साकिबचं नाव चर्चेत आलं. १९९० पासूनच साकीब तपासयंत्रणांच्या रडारवर होता, त्याच्यावर दहशतवाद आणि खुनाच्या आरोपाखाली किमान ११ खटले चालले आहेत आणि साधारण १५ वर्ष तो तुरुंगातही जाऊन आला आहे. एकेकाळी 'स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया' अर्थात सिमी या आता बंदी घालण्यात आलेल्या संघटनेचा महाराष्ट्रातला अध्यक्ष होता आणि नंतर या संघटनेचा जनरल सेक्रेटरी म्हणूनही त्यानं काम केलं होतं. ३ ऑगस्ट २०१२ रोजी भिवंडीमध्ये विश्व हिंदू परिषदेचे मनोज रायचा यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता, त्यातही साकीब आरोपी होता, याशिवाय गोरक्षकांचे वकिल ललित जैन यांची २००२ साली हत्या करण्यात आली होती, त्यातही तो आरोपी होता.

## संपादकीय ......

# वीज दराचा दिलासा

वीज बचत आणि निर्मितीचे नवे मार्ग शोधल्यास त्याचा वापरकर्त्यास कसा लाभ होऊ शकतो, एखाद्या क्षेत्रात राबवलेले दीर्घकालीन धोरण कसे परिणामकारक ठरू शकते, याचे महाराष्ट्र आदर्श उदाहरण ठरू शकते. राज्यात वीज दर कपातीचा निर्णय झाल्याने या कृतिशील प्रयोगावर शिक्कामोर्तब झाले. आता दरमहा १०० युनिटपर्यंत वीज वापरणार्या घरगुती ग्राहकांच्या वीज दरात १ जुलैपासून १० टक्के कपात होईल. त्याहून अधिक वीज वापर असलेल्या मध्यमवर्गीय घरगुती आणि वाणिज्यिक-औद्योगिक वीज वापरासाठी एक ते तीन टक्के इतकी किरकोळ दर कपात करण्यात आली. सर्व गटांतील ग्राहकांच्या वीज दरात पुढील पाच वर्षांत दर कपात करण्याचा आदेश राज्य वीज नियामक आयोगाने दिला. राज्याच्या आजवरच्या इतिहासात प्रथमच पहिल्या वर्षी १० टक्के आणि टप्प्याटप्प्याने कपात करत पाच वर्षांत २६ टक्के वीज दर कमी होणार आहे.

पूर्वी १० टक्के वीज दरवाढीच्या याचिका सादर होत होत्या; पण यावेळी प्रथमच महावितरणने वीज दर कमी करण्यासाठी याचिका दाखल केली आणि त्यावर आयोगाने हा आदेश दिला. त्यानुसार घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांचेही वीज दर कमी होतील. राज्यात येत्या पाच वर्षांत विजेचे दर कमी होतील, अशी घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी महायुती सरकारचा पहिला अर्थसंकल्प जाहीर करतानाच केली होती. ऊर्जा क्षेत्रातील नियोजन व कमी दराच्या हरित ऊर्जेच्या खरेदीमुळे राज्यातील औद्योगिक वीज दर अन्य राज्यांच्या तुलनेत कमी होतील, असे आश्वासन त्यांनी दिले होते. राज्यात १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणार्यांचे प्रमाण ७० टक्के असून, त्यांच्यासाठी सर्वाधिक म्हणजे १० टक्के इतके वीज दर कमी होतील. भविष्यात सौर वीज प्रकल्पांद्वारे मोठ्या प्रमाणात तीन ते साडेतीन रुपये प्रतियुनिट दराने स्वस्तात वीज उपलब्ध होणार असल्यामुळे ही वीज कपात शक्य होत आहे. वास्तविक वीज नियामक आयोगाने १ एप्रिलपासूनचे नवीन दर जाहीर केले होते.महावितरणने ४८ हजार कोटी रुपयांची तूट येणार असल्याची माहिती जाहीर केली होती. सातत्याने शेतकर्यांना वा अन्य वर्गांना द्याव्या लागणार्या सवलतीचा बोजा हळूहळू वाढत गेला, हे नाकारता येणार नाही; पण महावितरणचा दावा आयोगाने मान्य केला नाही. उलट महावितरणकडे ४४ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त शिल्लक राहील, असा निष्कर्ष आयोगाने काढला. महावितरणने त्याबाबत फेरविचार याचिका सादर केली. त्याची दखल घेत आयोगाने महावितरणच्या मागण्या मान्य करून, महसूलवाढ होण्याच्या दृष्टीने आदेश जाहीर केले. मुळात महावितरणने मुंबईतील काही भागांत, तर अदानी व टॉरेंट या खासगी वीज कंपन्यांनी परस्परांच्या परवाना क्षेत्रात वीज वितरण करण्याची परवानगी मागितली आहे.

अशावेळी बाजारपेठीय स्पर्धा वाढणार असून, त्यामुळेच वीज दरात कपातीची शक्यता आहे. मागच्या अडीच वर्षांत वीजपुरवठ्यासाठी केलेल्या उत्तम नियोजनामुळे आगामी पाच वर्षांत वीज खरेदीवरील खर्चात ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार आहे. राज्य सरकारने अपारंपरिक ऊर्जा स्रोतांवर भर दिला असून, त्याचाही लाभ होणार आहे. याखेरीज ४५ हजार मेगावॉटने विजेची क्षमता वाढवण्यासाठी वीज खरेदी करार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हरित ऊर्जा क्षेत्रावर विशेष लक्ष दिले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आता यापुढे सकाळी ९ ते सायंकाळी ५ पर्यंत वापरलेल्या विजेच्या दरात पहिल्या वर्षी ८० पैसे प्रतियुनिट सूट मिळणार आहे; मात्र त्यासाठी घरगुती ग्राहकांकडे स्मार्ट मीटर असावे लागेल. १ जुलैपासून ही सवलत सुरू होणार असून, त्यासाठी स्मार्ट मीटरची सक्ती आवश्यक होती का, असा प्रश्न विचारता येईल.

# वीज बळकटीकरणाचा व्यापक आराखडा तयार करा -पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती,** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या २०३४ पर्यंतच्या जिल्हा विकास व्हिजनच्या अनुषंगाने महापारेषणने अमरावती जिल्ह्यासाठी वीज बळकटीकरणाचा व्यापक विकास आराखडा तयार करावा. जिल्ह्यातील वाढत्या ऊर्जा गरजांमुळे आणि सौर ऊर्जेचा झपाट्याने वाढणारा प्रवाह लक्षात घेऊन हा आराखडा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.महापारेषण कार्यालय प्रकाशसरीत येथे पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी महापारेषण आणि महावितरणची आढावा बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते. आमदार प्रताप अडसड, राजेश वानखडे, प्रविण तायडे, चंदू उर्फ उमेश यावलकर, प्रविण पोटे-पाटील यांच्यासह महापारेषण मुख्य अभियंता जयंत विके, महावितरण मुख्य अभियंता अशोक साळुंके, अधीक्षक अभियंता दीपक देवहाते, प्रणोती देशमुख, प्रमोद पखाले, सागर जारे तसेच सर्व विभागीय कार्यकारी अभियंता,उपकार्यकारी अभियंता यावेळी उपस्थित होते.



पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, जिल्ह्यात वीज क्षेत्राच्या मजबुतीकरणासाठी २०३४ च्या अनुषंगाने तयार करण्यात येत असलेल्या आराखड्यात प्रामुख्याने नवीन २२० केव्हीचे उपकेंद्र, ४०० केव्ही व २२० केव्ही वीज वाहिन्यांचे जाळे, तसेच 'रिंग मेन' संरचना उभारण्याचा समावेश करण्यात यावा. यामुळे जिल्ह्यातील वीज पुरवठा अधिक सक्षम, सातत्यपूर्ण आणि विश्वासार्ह होईल. विशेषतः मेळघाटातील दुर्गम भागांचाही या विकास आराखड्यात समावेश करण्याचे निर्देश यावेळी दिले.तसेच महापारेषण कंपनीने जिल्ह्यात सुरु असलेल्या ४३१ कोटी रुपयांच्या प्रगतीपथावरील प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावे.अचूकता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी वीज वाहिन्यांच्या देखभाल-दुरुस्ती आणि सर्वेक्षणासाठी ड्रोनचा वापर करण्याचे निर्देशही पालकमंत्री यांनी यावेळी दिले.पालकमंत्री श्री.बावनकुळे पुढे म्हणाले, महावितरणने लोकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांचे प्रश्न समजून घ्यावे. 'लोकाभिमुख सरकार' निर्माण करण्यासाठी महावितरणचा पुढाकार असावा. या पार्श्वभूमीवर, मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता आणि उपकार्यकारी अभियंता यांनी महिन्यातून किमान चार वेळा एखाद्या गावांमध्ये भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधावा, अशा सूचना दिल्या.याशिवाय, वारंवार वीज खंडित होणाऱ्या समस्यांवर मूळ कारणांचा शोध घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले. उपकार्यकारी अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी प्रत्येक महिन्याला स्थानिक आमदारांची भेट घेऊन त्यांच्या तक्रारी जाणून घेवून त्यांचे निराकरण करावे. तसेच लोकप्रतिनिधींशी चर्चा करून कामाचे नियोजन करावे, असेही सांगितले. अधीक्षक अभियंता यांनी तक्रारींवर तातडीने कारवाई करून त्यांचे निवारण करावे. आस्थापनांमध्ये नियुक्त कर्मचार्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास राहून ग्राहकांना समाधानकारक सेवा द्यावी, अशाही सूचना त्यांनी यावेळी दिल्या.ऊर्जा क्षेत्रातील या सर्वसमावेशक पायाभूत विकास आराखड्यामुळे अमरावती जिल्ह्यातील वीज व्यवस्थापन अधिक सक्षम होणार असून, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सक्षम महाराष्ट्र या संकल्पनेला प्रत्यक्ष आकार येणार असल्याचे पालकमंत्री श्री. बावनकुळे यावेळी म्हणाले.




# आरोग्यासाठी 'आहार सातच्या आत'

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**

बॉलीवूडमधील काही कलाकार आपल्या फिटनेससाठी काटेकोर जीवनशैली पाळतात. यापैकी एक सामान्य सवय म्हणजे रात्रीचा आहार सायंकाळी सातच्या आत घेणं. अलीकडेच हिंदी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री मुमताज यांनी सांगितलं की, त्या रात्री काहीही खात नाहीत. विशेष म्हणजे, हा सल्ला त्यांना अभिनेता अक्षय कुमार यांनी दिला होता. तेव्हापासून मुमताज आज वयाच्या ७७ व्या वर्षीही या नियमाचं पालन करतात. रात्रीच्या जेवणाऐवजी फळं खातात. त्यांनी आपली दिनचर्या स्पष्ट करताना सांगितलं की, त्या ९ ते १० वाजण्याच्या दरम्यान झोपतात आणि ४ ते ५ वाजता उठतात. सकाळी ७ वाजता व्यायाम, नंतर ब्लॅक टी आणि हलकं, चरबी न वाढवणारं न्याहारी करतात. दुपारी नियमित जेवण घेतात; पण संध्याकाळी फक्त फळं.

शास्त्रानुसार ६.३० नंतर अन्न खाणं टाळावं. कारण, रात्री उशिरा खाल्ल्यास शरीर विश्रांती घेऊ शकत नाही. पचनक्रिया सुरू राहते. त्यामुळे शरीरातील विविध अवयवांवर ताण येतो. अक्षयच्या मते रात्री भूक लागलीच, तर सूप किंवा सॅलड यांचे सेवन करावे.

अभिनेते मनोज वाजपेयी यांनी १३-१४ वर्षांपासून रात्रीचं जेवण बंद केलं आहे. क्वचित प्रसंगी ते थोडं काही खातात; पण बहुतेकवेळा पूर्ण उपाशी राहण्याला प्राधान्य देतात. पुढे डॉक्टरांचं मत ऐकून त्यांनी संध्याकाळनंतर अन्न टाळण्याचा पूर्ण निर्णय घेतला. सातच्या आत जेवणामुळे पचन सुधारते, झोप चांगली लागते, वजन नियंत्रणात राहतं, रक्तशर्करेची पातळी नियंत्रणात राहण्यास मदत होते आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे शरीरातील ऊर्जा वाढते. बॉडी क्लॉक नीट राहते.



तथापि, प्रत्येकाचं शरीर वेगळं असतं. त्यामुळं रात्रीचं जेवण पूर्णपणे वर्ज्य करणं काहींना त्रासदायक ठरू शकतं. यातून थकवा येणं, चक्कर येणं, पोषणतत्त्वांची कमतरता निर्माण होणं यासारख्या समस्या जाणवू शकतात. हे टाळण्यासाठी रात्री दूध, अंडी, पनीर, सुकामेवा, चेरीसारखे हलके पण पौष्टिक पर्याय घ्यावेत.

# महाराष्ट्रातून परराज्यांत शेतमाल नेण्यासाठी ५० टक्के अनुदान, काय आहे ही योजना?

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक**

महाराष्ट्रातून परराज्यांत शेतमाल नेण्यासाठी ५० टक्के अनुदान, काय आहे ही योजना?

शेतकऱ्यांचा उत्पादित नाशवंत शेतमाल जसे कांदा, टोमॅटो, केळी, द्राक्षे, डाळींब, आंबा, संत्रा, मोसंबी, आले आणि इतर भाजीपाला वेळेत परराज्यात पाठवता येत नाही. कारण फक्त परवडणारी वाहतूक नाही. त्यामुळे यामुळे शेतकरी कधी संधी गमावतो, तर कधी नफ्याऐवजी तोटा सहन करतो. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या कृषी पणन मंडळाने एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे.

'आंतरराज्य शेतमाल व्यापारासाठी रस्ते वाहतूक अनुदान योजना'. या योजनेंतर्गत आता शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्था यांना वाहतूक खर्चावर ५०% अनुदान मिळणार आहे. ही योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत लागू राहणार असून, देशांतर्गत व्यापाराला नवे पंख देणारी ठरणार आहे.

**बाजारपेठेचा थेट रस्ता**

शेतमालाला योग्य भाव मिळण्यासाठी तो बाजारात पोहोचणे तितकेच गरजेचे आहे, जितके उत्पादन. फळभाजीसारखा नाशवंत शेतमाल वेळेत विक्रीच्या ठिकाणी न गेल्यास २० ते ३० टक्के नुकसान होऊ शकते. हीच बाब लक्षात घेऊन, राज्य शासनाने शेतकऱ्यांना थेट देशभरातील बाजारपेठांशी जोडण्यासाठी वाहतूक खर्चात मदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

या योजनेंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्या व सहकारी संस्था यांना त्यांच्याच सभासदांकडून उत्पादित शेतमाल परराज्यात विक्रीसाठी पाठवण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे.

**योजनेच्या अटी व पात्रता**

योजना केवळ महाराष्ट्रातून परराज्यांत रस्ते वाहतुकीने थेट विक्री होणाऱ्या शेतमालासाठी लागू.

नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या व सहकारी संस्था पात्र.

फक्त त्यांच्या सभासदांनी उत्पादित केलेला माल पाठवता येईल.

योजना आंबा, केळी, डाळींब, द्राक्षे, संत्रा, मोसंबी, कांदा, टोमॅटो, आले, भाजीपाला या नाशवंत पिकांसाठी लागू आहे.

याशिवाय इतर नाशवंत मालासाठी मंडळाची पूर्वमान्यता घ्यावी लागेल.

माल विक्री झाल्यानंतरच अनुदान मिळणार.

प्रत्यक्ष वाहतुकीसाठीच अनुदान. इतर खर्चावर (पॅकिंग, हमाली, सेवा शुल्क) अनुदान नाही.

**अंतरानुसार देय अनुदान**

३५० ते ७५० किमी: ५०% किंवा २०,०००

७५१ ते १००० किमी: ५०% किंवा ३०,०००

१००१ ते १५०० किमी: ५०% किंवा ४०,०००

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

१५०१ ते २००० किमी: ५०% किंवा ५०,०००

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

२००१ किमी आणि त्याहून अधिक: ५०% किंवा ६०,०००

सिक्कीम, आसाम, अरुणाचल, नागालँड, मणिपूर, मिझोराम, मेघालय, त्रिपुरा: ५०% किंवा ७५,०००

(जे कमी असेल ती रक्कम देय असेल)

योजनेची ठळक वैशिष्ट्ये

३५० कि.मी. पेक्षा कमी अंतरावर अनुदान नाही.

एका संस्थेला वर्षाला ३ लाखांपर्यंत अनुदान मर्यादा.

वाहतूक भाडे केवळ बँक व्यवहारातून अदा करणे बंधनकारक.

किमान ३ सभासदांचा माल एका ट्रिपमध्ये पाठवणे आवश्यक.

विक्री न झाल्यास अनुदान नाही. मंडळ जबाबदार नाही.

विक्रीनंतर ३० दिवसांत अर्ज सादर करणे आवश्यक.

आवश्यक कागदपत्रे

पूर्वमान्यता अर्जासाठी




अर्ज, नोंदणी प्रमाणपत्र, सभासद यादी, ७/१२ उतारे, बँक पासबुक प्रत, लेखापरिक्षण अहवाल

अनुदान मागणी अर्जासाठी

पूर्वमान्यता पत्र, ट्रान्सपोर्ट बिल व पावती, विक्री बिल, बँक व्यवहाराचा तपशील.

ही योजना म्हणजे केवळ शेतमाल पोहोचवण्यासाठीचा खर्च वाचवण्याचा उपाय नाही, तर ही आहे एक संधी, थेट देशाच्या कोपऱ्यांपर्यंत आपल्या मालाची पोच वाढवण्याची! शेतकरी उत्पादक कंपन्यांनी आता संयोजनबद्ध पद्धतीने ही योजना आत्मसात केल्यास फक्त राज्यातच नव्हे, तर देशपातळीवर स्पर्धात्मक बाजारपेठ मिळवणे शक्य होईल. 'शेती फक्त उपजीविका नाही, ती व्यवसाय व्हावा' या उद्देशाने ही योजना एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# श्री संत गाडगे महाराज बालगृहातील वातावरण पाहून मन प्रसन्न-एड. जितेंद्र चौधरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८दर्यापूर** - श्री संत गाडगे महाराज बालगृह दर्यापूर यांना आज अकस्मित भेट दिली असता तेथील वातावरण पाहून मन प्रसन्न झाले असे प्रतिपादन समिती प्रमुख विधी अधिकारी जितेंद्र चौधरी यांनी केले त्यांनी संपूर्ण बालगृहातील सेवाकार्याचा विद्यमान परिस्थितीचा आढावा घेऊन ते बोलत होते जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय अमरावती ची तपासणी समिती अचानक श्री संत गाडगे महाराज बालगृह येथे आली असता त्यांनी सखोल चौकशी करून वस्तुस्थिती प्रत्येक ठिकाणची जाणून घेतली व समाधान व्यक्त केले व्यक्त केले.

## जिल्हा तपासणी समितीने दिली बालगृहास आकस्मित भेट

नोंदणी प्रमाणपत्र नूतनीकरण प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करणे करता समितीने भेट दिली होती उपायुक्त बालविकास महिला व बाल विकास आयुक्तालय श्री राहुल मोरे यांच्या आलेल्या पत्रावरून त्यांनी आज बालगृहाची पाहणी केली व अहवाल सादर करतील त्या समितीमध्ये समिती प्रमुख म्हणून विधी अधिकारी श्री जितेंद्र चौधरी, परिविक्षा अधिकारी श्रीमती वैशाली चोरे शासकीय मुलींचे वस्तीगृह अमरावतीच्या समुपदेशक रुंदा फाटे, परिक्षा अधिकारी नम्रता कडू यांचा समावेश होता बालगृहाचे संचालक गजानन देशमुख यांनी शब्द सुमनांनी सर्वांचे स्वागत केले त्यावेळेस सौ रितिका वैभवराव देशमुख नारखेडकर या उपस्थित होत्या त्यानंतर ती समिती चिंतामणी बालगृह बनोसा या संस्थेला भेट देण्याकरिता निघून गेले



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

शनिवार दि. २८ जून २०२५ शहर/ग्रामिण




## जिल्हास्तरीय खरीप हंगाम आढावा बैठक संपन्न

# शेतीतील उत्पादन वाढविण्यासाठी प्रभावी नियोजन करा - पालकमंत्री बावनकुळे

## शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी 'संवाद बैठक' उपक्रम राबवा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती-** राज्य शासन कृषी क्षेत्रातील विकासासंदर्भात विविध योजना राबवत आहे. या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे शेतीतील उत्पादन वाढण्यासाठी प्रभावी नियोजन करावे. तसेच कृषी विषयक बाबींचे मार्गदर्शन करण्यासाठी गावपातळीवर शेतकऱ्यांसाठी 'संवाद बैठक' म्हणून उपक्रम राबविण्यात यावा, असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कृषी विभागाला आज दिले.येथील जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय खरिप आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. आमदार सर्वश्री रवी राणा, प्रताप अडसळ, प्रवीण तायडे, राजेश वानखेडे, माजी आमदार प्रवीण पोटे-पाटील, कृषी सहसंचालक प्रमोद लव्हाळे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, संचालिका अर्चना निस्ताने, उपसंचालक वरुण देशमुख यांच्यासह जिल्ह्यातील सर्व तालुका कृषी अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.यावेळी खरिप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाचे नियोजन व कामकाजासंदर्भात आढावा घेऊन पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले की, कृषी क्षेत्राचा व शेतकऱ्यांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने राज्य शासन विविध योजना राबवित आहे. शेती पिकांचे संरक्षण आणि त्यांची जोपासना करण्यासाठी, पिकांवर आलेली कीड नियंत्रणासाठीचे कार्यक्रम, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत व्यापारी पिकांसाठीच्या योजना आदी उपक्रमही राबविले जात आहे. राज्य अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्ण होणे हा योजनेचा प्रमुख उद्देश आहे. शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर प्राप्त होण्यासाठी अन्नधान्य पीक योजना, पौष्टिक तृणधान्य योजनेंतर्गत पीक प्रात्याक्षिके राबविली जातात. अन्नधान्य पीक क्षेत्र विस्तार व उत्पादकतेमध्ये वाढ करून शेतकऱ्यांच्या उत्पादनात शाश्वत वाढ करणे, जमिनीची सुपीकता व उत्पादन क्षमता वाढविणे आदी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. खरिप हंगामासाठी बी-बियाणे व रासायनिक खतांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवून मागणीप्रमाणे त्याचे वितरण करावे. गरजू शेतकऱ्यांना बीयाणे व खतांचा पुरवठा उपलब्ध करुन द्यावा. बोगस बीयाणे, खते विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. बोगस बियाण्यांमुळे दुबार पेरणीची वेळ आली असा अनुभव सांगणारा एकही शेतकरी भेटू नये, असे पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

जिल्ह्यातील आदिवासी बहुल मेळघाट क्षेत्रातील शेतकऱ्यांना पौष्टिक तृणधान्याचे महत्व पटवून देऊन त्याक्षेत्रात कोदो, कुटूक, साका, नाचणी सारख्या तृणधान्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होण्यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. शेती पिकांच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी बी बियाणे व खतांचा पुरवठा करण्यात यावा. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यात द्यावी. सर्व तालुका कृषी अधिकाऱ्यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या कृषी सहाय्यकांना प्रोत्साहन देऊन तालुक्याच्या शेती पिकांचे उत्पादन वाढीचे लक्षांक शंभर टक्के पूर्ण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे. शेतीसाठी सिंचन सुविधा व अखंडीत वीज पुरवठा उपलब्ध होण्यासाठी सोलर पंप योजनेच्या लाभ शेतकऱ्यांना मिळवून द्यावा. कृषी यांत्रिकीकरण योजनेतून शेतीला लागणारे औजारे व उपकरणे पुरविण्यात यावेत. पिकांच्या उत्पादन घेण्यात यशस्वी ठरलेल्या शेतकऱ्यांच्या शेताला तालुक्यातील शेतकऱ्यांची प्रत्यक्ष भेट करुन प्रात्यक्षिक दाखविण्यात यावे. शेतकऱ्यांचे शेतीतील उत्पादन वाढीसाठी कृषी योजनांचा त्यांना लाभ मिळवून द्यावा, असेही पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले.जिल्ह्यातील तालुकानिहाय सरासरी पर्जन्यमान, पडलेला पर्जन्यमान अहवाल, खरीप पिक पेरणी क्षेत्र, झालेली पेरणी, पेरणीची टक्केवारी, बियाणे पुरवठा व विक्री, रासायनिक खत मागणी, पुरवठा व विक्री, कृषि निविष्ठांचे नमूने काढण्याचे लक्षांक, अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाणे विक्री प्रकरणी केलेली कारवाई, ग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत झालेल्या कामाचा अहवाल, पीएम किसान योजनेंतर्गत अहवाल, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना व नमो शेतकरी महासन्मान निधी योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना आदी संदर्भात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. सातपुते यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या प्रगती बाबतची माहिती दिली. यावेळी बैठकीत पिकाची अन्नद्रव्यांची गरज पूर्ण करण्यासाठी जमिनीत टाकावयाची खते याबाबत मार्गदर्शनपर भित्तीपत्रकांचा मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

## जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत परीक्षा मार्गदर्शन शिबिर व सत्कार सोहळा येत्या मंगळवारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती,** अमरावती जिल्ह्यातील जास्तीत-जास्त विद्यार्थ्यांनी प्रशासकीय सेवेत यावे आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व सक्षम व प्रभावी व्हावे, या दृष्टिकोनातून जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या संकल्पनेतून महत्त्वाचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. यूपीएससी आणि एमपीएससी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार आणि स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबिराचे आयोजन मंगळवार, दिनांक १ जुलै रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड, अमरावती येथे करण्यात आले आहे. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, अध्यक्ष जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांची प्रमुख उपस्थिती राहील.यापुढे प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला विद्यार्थ्यांचा सत्कार व स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात अमरावती शहरातून आयएएस (ख-ड) झालेले तसेच एमपीएससी (चझडउ) परीक्षा उत्तीर्ण झालेले यशस्वी विद्यार्थी उपस्थित राहणार असून, या वेळी त्यांचा विशेष सत्कार आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये युपीएसी परीक्षा उत्तीर्ण झालेले आनंद खंडेलवाल, शिवांक तिवारी, रजत पत्रे, नम्रता ठाकरे यांचा सत्कार करण्यात येईल. स्पर्धा परीक्षा उमेदवारांना त्यांच्या यशाचे रहस्य, अभ्यासाचे तंत्र आणि प्रशासकीय सेवेतील संधींविषयी यावेळी मार्गदर्शन करणार आहेत. जिल्हा प्रशासन अमरावतीच्या वतीने आयोजित हा उपक्रम, प्रशासकीय सेवेत रुजू होऊ इच्छिणाऱ्या जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी व्यासपीठ ठरणार आहे. इच्छुकांनी या मार्गदर्शन शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस (श. प.) पक्षामध्ये ५३ कार्यकर्त्यांचा प्रवेशसंघटन मजबुतीसाठी सर्वांनी प्रयत्न करावे- प्रा .डॉ.हेमंत देशमुख

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार हा एका विचारधारेवर चालणारा पक्ष असून नवीन कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात पक्षात प्रवेश घ्यायला सुरुवात केली आहे सर्वांनी संघटन मजबूत करण्यासाठी जोमाने प्रयत्न करावे असे आवाहन शहर जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ.हेमंत देशमुख यांनी केलेराष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाच्यावतीने आयोजित कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांनी प्रवेश घेतला यावेळी ते बोलत होते.राष्ट्रवादी काँग्रेस



(शरदचंद्र पवार) पक्षाचे अमरावती शहर जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ .हेमंत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली प्रदेश सचिव निखील देशमुख यांच्या नेतृत्वात ५३ कार्यकर्त्यांनी नुकताच पक्षात प्रवेश केला. यावेळी पक्षाचे पदाधिकारी सय्यद मंसूर, अविनाश ठाकरे, वर्षाताई भटकर, विशाल बोरखडे,मंगेश भटकर, सतिश चरपे इत्यादी पदाधिकारी उपस्थीत होते. यावेळी 'प्रफुल धनराज डोंगरे,संदेश केशव मेश्राम,महेश ज्ञानेश्वर रामटेके, आकाश ज्ञानेश्वर रामटेके, अजिमखान, मोईन खान,अमन रामचंद्र वानखडे, गौतम वले, गुलाल आवारे, कुनाल आवारे, ललीत यादव, दिपक राजपुत, मंथन शिरभाते, राहुल इंगळे, ऋषिकेश पंचवटे, राहुल राठे, अमिर खाँ वजिर खॉ पठान,धर्मेंद्र राक्षकर, सैय्यद इदीस सैय्यद नजिर, मोहन सदाशीव वडुरकर, आकाश खराते,मतीन खाँ हसन खाँ, असलम खाँ हसन खाँ,शहीद खाँ हसन खाँ,रियाज शेख,सूरज रामटेके,धर्मपाल मेश्राम,गजानन दहिकर,निलेश बोरगांवकर,मयुर शेंडे,सिध्दार्थ मेश्राम,पकंज मेश्राम,शैलेंद्र चेंडकापुरे, सागर राऊत,उमेश शेंडे, श्रीकांत जामनिक,निकेष डोंगरे, प्रविण भंडारे,सौरभ लांजेवार,राजु मेश्राम,समर्थ कोंडपर, सुधिर पाटील,सौरभ वर्मा आदींनी प्रवेश करून पक्षाचा झेंडा हाती घेतला. तसेच येणाऱ्या महानगर पालीका निवडणूकांमधे पक्षाच्या उमेदवारांना निवडून आणायचा निर्धार व्यक्त केला. पक्षप्रवेश घेतलेल्या सर्वांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी प्रा .डॉ.हेमंत देशमुख यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

# रहाटगावात ऑनलाईन लॉटरी सेंटरवर छापा

## शहर गुन्हे शाखेची कारवाई, एकाला अटक, संगणक जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती**स्थानिक रहाटगाव चौकातीलफोरसिजन मार्केटमधील ऑनलाईन लॉटरी सेंटरवर गुन्हे शाखेच्या युनिट-२ च्या पथकाने धाड घालून ऑनलाईन जुगार चालविणाऱ्या युवकाला अटक केली. त्याच्या ताब्यातून संगणक व रोख रक्कम असा एकूण २७ हजार ९८० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. गुरुवारी सायंकाळी ही कारवाई करण्यात आली.या कारवाईत गोपी राजू डाखोरे (वय ३०, रा. अप्परवर्धा कॉलनी) याला अटक करण्यात आली. ऑनलाईन सेंटरचे मालक संकेत कुलट (रा. राठीनगर) व रोहन तायडे (रा. देशमुख लॉनजवळ) हे दोघे असल्याची माहिती पोलिसाना मिळाली. पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. या ऑनलाईन सेंटरवर पोलिसानी धाड घातली तेव्हा त्याठिकाणी संगणकाच्या स्क्रिनवर फन टार्गेट या वेबसाईटवर चक्री या ऑनलाईन गेमवर पैशाची देवाण-घेवाणीचा खेळ सुरू होता. पोलिसांना पाहताच खेळणारे पळून गेले. संगणक हाताळणारा गोपी डाखोरे हा पोलिसांच्या हाती लागला. हा गेम चालविण्याकरिता लागणारी आवडी, पासवर्ड व बॅलेन्स गणेश झाडे (रा. यवतमाळ) याच्याकडून ऑनलाईन घेतो, असे त्याने पोलिसाना सांगितले. याप्रकरणी नादगावपेठ पोलिसात चार जणांविरूध्द जुगारबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई गुन्हे शाखा युनिट-२ चे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, उपनिरीक्षक संजय वानखडे, गजानन देवले, दीपक सुंदरकर, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, संग्राम भोजने, मंगेश शिंदे, योगेश पवार, राजीक रायलीवाले, विशाल वाकपांजर, सागर ठाकरे, चेतन कराडे, संदीप खंडारे, राहुल दुधे यांच्या पथकाने केली.

# दामिनी पथकाचा हॉटेल निमंत्रणावर छापा

## २ प्रेमीयुगल ताब्यात समज देवून केले पालकांच्या स्वाधीन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२८अमरावतीः**

शहरी विविध भागात तरुण-तरुणींना काही रुपयांच्या मोबदल्यात अश्लील कृत्ये करण्यासाठी खोल्या उपलब्ध करून दिल्या जात आहेत. अलीकडेच दामिनी पाठक यांनी छत्री तलाव रोडवरील दोन कॅफेवर छापा टाकला होता. त्यानंतर शुक्रवारला पुन्हा एकदा दामिनी पथकाने जुन्या बायपासवरील हॉटेल निमंत्रण येथे छापा टाकला आणि अश्लील कृत्ये करताना दोन प्रेमीयुगुलांना ताब्यात घेतले.शहरातील जुन्या बायपासवरील हॉटेल निमंत्रण येथे अश्लील कृत्ये सुरू असल्याची माहिती मिळाल्यावर, पथकाच्या कर्मचाऱ्यांनी जुन्या बायपासवरील हॉटेल निमंत्रण येथे छापा टाकला. यावेळी अश्लील कृत्ये करताना दोन प्रेमीयुगुलांना अटक केली आणि त्यांच्या पालकांना कळवले. त्यानंतर त्यांच्या पालकांच्या



हवाली करण्यात आले.पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या आदेशानुसार महिला सेलच्या पीआय दीप्ती ब्राम्हणे मॅडम यांच्या नेतृत्वात दामिनी पथक सेलच्या महिला कर्मचारी भाग्यशाली पवार, प्रिया येवले, पूजा सपकाळ, मीना उंबरकर, वैशाली सोळंके, अंकिता जावरकर, सुनीता वानखडे, राजेंद्र यादव, सुनील मेटकर, पंकज पाटिल, प्रेमकुमार यादव, संदीप अकोलकर आदीनी ही कारवाई केली.

# आवास योजनेकरीता लाभार्थ्यांना कोणत्याही मध्यस्थांशी पैशांची देवाणघेवाण करू नये

## गटविकास अधिकारी डॉ. शेलार यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२८नांदगाव खंडेश्वर**
११पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) आणि राज्य पुरस्कृत आवास योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. आर्थिक वर्ष २०४-२५ मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेसाठी ४४७० घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून पुढील वर्ष २०२५-२६ साठी ९७१ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. याशिवाय राज्य पुरस्कृत आवास योजनेसाठी २०२३-२४ मध्ये ६२८ तर २०२४-२५ मध्ये २०० घरकुलांचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. या योजनांचा लाभ देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावरून कच्च्या घरांमध्ये वास्तव्यास असलेल्या बेघर लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. निवडीनंतर पात्र लाभार्थ्यांची यादी व प्रस्ताव पंचायत समितीकडे पाठवले जातात. त्यानंतर पंचायत समिती स्तरावरून आवश्यक पडताळणी करून प्रस्ताव जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे सादर केला जातो. जिल्हास्तरावरून मंजुरी ऑनलाइन स्वरूपात दिल्यानंतर प्रथम हप्ता पंचायत समितीकडून वितरित केला जातो. गटविकास अधिकारी डॉ. स्नेहल शेलार यांनी स्पष्टपणे सांगितले की, ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक असून कोणत्याही प्रकारच्या पैशाच्या देवाणघेवाणीची आवश्यकता नाही. कोणताही कर्मचारी लाभार्थ्याकडून आर्थिक मागणी करत असेल तर अशा प्रकरणांची लेखी तक्रार पंचायत समिती कार्यालयात त्वरित करावी असे आवाहन त्यांनी केले आहे.

# डीसीपी कल्पना बारवकर, सागर पाटील यांची बदली उपायुक्त म्हणून बृहन्मुंबईहून येणार श्याम घुगे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती -** शहर पोलीस आयुक्तालयात उपायुक्त म्हणून कार्यरत असलेल्या कल्पना बारवकर यांची बदली सांगली येथे अपर पोलीस अधीक्षक म्हणून झाली आहे. शहर पोलीस आयुक्तालयात नवे उपायुक्त म्हणून बृह मुंबईहून श्याम पुगे हे येणार आहेत.





राज्य शासनाच्या गृह विभागाने पोलीस अधिकाऱ्यांच्या बदली व पदस्थापनेबाबतचे आदेश शुक्रवारी (दि. २७) जारी केले. यामध्ये अमरावती शहर पोलीस आयुक्तालयात पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांची बदली सांगली येथे अपर पोलीस अधीक्षक म्हणून झाली आहे. तर बृहन्मुंबई येथील अंमली पदार्थविरोधी कक्षाचे पोलीस उपायुक्त श्याम घुगे यांची बदली अमरावती शहर पोलीस आयुक्तालयात उपायुक्त म्हणून करण्यात आली आहे. शहर पोलीस आयुक्तालयातील पोलीस उपायुक्त सागर पाटील यांची मुंबईच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलीस अधीक्षक म्हणून बदली झाली आहे. शासनाचे सहसचिव व्यंकटेश भट यांच्या सहीनिशी राज्यातील ५२ पोलीस उपायुक्त स्तरावरील अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढण्यात आले आहेत. पोलीस आयुक्तालयात उपायुक्तांची चार पदे आहेत. परंतु अनेक वर्षे त्यातील काही पदे रिक्त होती. एवढ्यातच अमरावती शहर आयुक्तालयात चार उपायुक्त मिळालेले असताना यातील दोन अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. परंतु त्या बदल्यात अम रावतीसाठी एका उपायुक्ताची बदली करण्यात आली आहे.

# वेलकम टी पॉइंट येथे कारवाईदेशी कट्ट्यासह तिघांना अटक एक जिवंत काडतूसही ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२८अमरावती-**

देशी कट्टा घेऊन नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तिघांना वेलकम टी पॉइंट येथे पोलिसांनी पकडले. आरोपींजवळून देशी कट्टा व एक जिवंत काडतूसताब्यात घेण्यात आले असून, सुमारे ३१ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गाडगेनगर पोलिस ठाण्यातील डीबी पथकाने शुक्रवारी ही कारवाई केली. शहरातील वेलकम टी पॉइंट येथे देशी कट्टा घेऊन फिरणाऱ्या तिघांना सापळा रचून पकडण्यात आले. आरोपींमध्ये मयुर उर्फ माया प्रकाश चव्हाण, (वय २०) गर्जेन्द्र सुधाकर पवार, (२०) राज गोकुल सोळंके, (२०) सर्व



रा. विलासनगर यांचा समावेश आहे. त्यांच्याजवळून ३०,००० रू. किमतीचा देशी कट्टा व १,००० रू. किमतीचे एक जिवंत कारतूस असा एकुण ३१,००० ३१,०००/ रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी कलम ३/२५ आर्म ॲक्ट, कलम ३ (५) भा.न्या. स. सहकलम १३५ मपोका नुसार गुन्हा दाखल केला. ही कार्यवाही पोलीस आयुक्त अरविद चावरिया, पोलीस उपआयुक्त सागर पाटील, सहा. पोलीस आयुक्त अरुण पाटील, व वपोनि अतुलकुमार क्राईम पोनि. विजय पंधरे यांचे मार्गदर्शनाखाली गाडगेनगर डि.बी. पथक प्रमुख - मनोजकुमार मानकर, निलेश जुनघरे, गजानन बरड सुशांत प्रधान, मतीन - शेख, सिध्दार्थ शृंगारे यांनी केली आहे.-

# नव्या उद्योजकांना उद्योग उभारण्यासाठी एमआयडीसीत जागा नाही

## धामणगावच्या एमआयडीसीची १८८ हेक्टर जमीन उद्योगांशिवाय पडून

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८धा.रेल्वे**

एकीकडे नव्या उद्योजकांना उद्योग उभारण्यासाठी एमआयडीसीमध्ये जमीन मिळत नाही, तर दुसरीकडे गरजेपेक्षा पाच-सात पट अधिक ताब्यात घेतलेली जमीन उद्योगाविना वर्षानुवर्षे पडून आहे. एवढेच नव्हे, तर लाखो रुपये दराने ही जमीन परस्पर विक्री वा हस्तांतरित केली जात आहे. ९९ वर्षांच्या लीजवर दिलेली ही जमीन एमआयडीसी परत का घेत नाही, असा सवाल धामणगाव रेल्वे तालुक्यातील नागरिकांचा आहे.

जळगाव आर्वी येथील एमआयडीसी परिसरात वीज, पाणी उपलब्ध आहे. येथून समृद्धी महामार्ग, धामणगाव रेल्वेस्थानक तीन किलोमीटर अंतरावर आहे. तथापि, जवाहर सहकारी सूतगिरणी सोडली, तर एकही मोठा उद्योग येथे नाही. जे उद्योग सुरू आहेत, ते अखेरच्या घटका मोजत आहेत. उद्योजकांच्या अनेक अपेक्षा, सूचना, तक्रारी, समस्या आहेत. दुसरीकडे त्यांचे कारनामेही पुढे येत आहेत. ताब्यात आलेली जादा जमीन उद्योग बंद




पडल्यानंतर ९९ वर्षांच्या लीजवरील या जमिनी आता लाखांच्या दराने बिल्डर लॉबीला विक्री वजा हस्तांतरित केल्या जात आहेत. वास्तविक आजचा बाजारभाव देऊन या जमिनी एमआयडीसीनेच ताब्यात घ्याव्यात आणि नव्या उद्योजकांना उपलब्ध कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. उद्योगाबाबत तीन दशकांपूर्वीची स्थिती व आजची स्थिती यात खूप फरक पडल्याचे उद्योजक सांगतात. पूर्वीची सहकार्याची भावना आता राहिली नाही. त्याऐवजी बहुतांश ठिकाणी 'अपेक्षा' बाळगली जाते. छोट्या उद्योजकांचे छळ होत असल्याचे प्रकार पाहायला मिळत आहेत.

एमआयडीसीकडे १८८ हेक्टर जमीन पडून आहे. लघुउद्योजकांसाठी योग्य दिशा, मार्गदर्शन, जमीन, भांडवल, बँक गॅरंटी याचा अभाव आहे. झारीतील शुक्राचार्यांमुळे उद्योजक त्रस्त असल्याचे सांगण्यात येते. लघुउद्योजकांना पाठबळ देण्याचे काम शासन कधी करणार आहेत, असा सवाल निर्माण होत आहे.

एमआयडीसी परिसरात मोठा उद्योग यावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे. त्यांच्याशी चर्चा सुरू आहे. येथे उद्योग येण्यासाठी आपली धडपड सुरू आहे.

**– प्रताप अडसड, आमदार**



**ऑक्सिजन पार्क परिसर, काँग्रेस नगर , बियाणी चौक आणि विद्या भारती कॉलेज परिसरात**

# स्वच्छतेसंदर्भात महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची प्रत्यक्ष पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती–**

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी ऑक्सिजन पार्क समोरील परिसर, काँग्रेस नगर नाला, बियाणी चौक आणि विद्या भारती कॉलेज परिसरात स्वच्छतेसंदर्भात प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणी दरम्यान संबंधीत विभागांना तातडीने स्वच्छता मोहीम राबविण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. आयुक्तांच्या निर्देशानुसार सदर स्वच्छतेची कामे सुरु करण्यात आली असून संबंधीत ठिकाणी स्वच्छता मोहीम युध्दपातळीवर सुरु आहे. शहरातील परिसरात झाडांच्या फांद्या रस्त्यावर दिसत असेल तर त्या झाडांच्या फांद्या उचलण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्तांनी उद्यान विभागांना दिले. बांधकाम करतांना बांधकाम साहित्य रस्त्यावर आढळून आल्यास सदर बांधकाम करणा-यांवर कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधीत अधिका-यांना दिले. सदर परिसरात काम करण्याकरीता यंत्रणा कमी पडत असेल सदर यंत्रणा वाढविण्याचे निर्देश दिले. सदर परिसराची साफ सफाई झालीच पाहिजे यासाठी अधिका-



यांनी प्रयत्न करावे.सदर भागात काटेकोर स्वच्छता असावी याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश देतानाच सदर कामांमध्ये गटार साफ केल्यानंतर त्यातून काढला जाणारा गाळ उचलून नेण्याच्या आयुक्तांनी सक्त सूचना केल्या. सदर ठिकाणी कचरा उचलण्याची कार्यवाही करण्यात यावी व नागरिक इतरत्र कचरा टाकतांना आढळून आल्यास त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले. सदर परिसरातील नागरिकांकडून कचरा घंटागाडीद्वारे संकलन करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले.यावेळी नाल्यांची आणि गटारांची सफाई केल्याने पाण्याचा योग्य निचरा होतो, ज्यामुळे पूर किंवा पाणी साठण्याची शक्यता कमी होते. कचरा आणि साठलेल्या पाण्यामुळे डास आणि इतर कीटकांची संख्या वाढू शकते, ज्यामुळे अनेक रोगराई पसरण्याची शक्यता असते. साफसफाई केल्याने या समस्या कमी होतात. कचरा आणि घाण साफ केल्याने वातावरण स्वच्छ होते, ज्यामुळे आरोग्य चांगले राहते. नाल्यांमध्ये आणि गटारांमध्ये साठलेला कचरा आणि गाळ काढून स्वच्छ करणे आवश्यक आहे. सार्वजनिक ठिकाणी पडलेला कचरा आणि प्लास्टिक उचलून योग्य ठिकाणी जमा करणे आवश्यक आहे. रस्ते, चौक आणि सार्वजनिक जागा स्वच्छ करणे आवश्यक आहे. नागरिकांना कचरा टाकू नये, प्लास्टिकचा वापर कमी करावा आणि साफसफाईत सहभागी व्हावे यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे. महानगर पालिकेतील संबंधीत अधिका-यांनी सदर कामात सक्रिय भूमिका बजावणे आवश्यक आहे. नागरिकांनीही या कामात सहभागी होऊन आपल्या परिसराची स्वच्छता जपण्यासाठी मदत करावी असे आवाहन महानगर पालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे. महानगर पालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक म्हणाल्या की, शहराची स्वच्छता यासह घनकचरा व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालय, एसटीपी प्लान्ट याकडेही लक्ष द्यावे. लोकसहभागातून शहराच्या सौंदर्यीकरणावर भर द्यावा. विशेषत: वृक्षरोपण यासारखे उपक्रम लोकसहभागातून राबवावेत. येत्या जुलै महिन्यात खुल्या जागांवर वृक्ष लागवड करावी. स्वत: अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शहरात फिरुन पाहणी करावी. नाविण्यपूर्ण उपक्रम राबवून शहर सुंदर करावे. अमरावती शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी लोकसहभागातून शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात यावे. शहराच्या स्वच्छतेसाठी सर्व नागरिकांचा सहभाग आवश्यक असून यापुढेही नागरिकांनी सदर अभियानात सहभाग नोंदविण्याची आवश्यक ता असल्याचे प्रतिपादन महानगर पालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले.या पाहणी दरम्यान वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, कुंदन हडाले, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# तुकोबांच्या पालखी सोहळ्यात रंगले पहिले अश्व रिंगण; लाखो वैष्णव विठुरायाच्या भेटीला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८लासुर्णे (इंदापूर) :**

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यातील पहिले अश्व रिंगण बेलवाडी (ता. इंदापूर) येथे शनिवारी (दि. २८) उत्साहात पार पडले. पालखी सोहळ्यातील अश्व रिंगण सोहळा हा वारकरी भाविकांसाठी त्यांचे देहभान विसरवणारा, सावळ्या विठूच्या चरणी लीन करणारा, शीण घालविणारा, चैतन्याचा झरा असतो.

या सोहळ्यात टाळ-मृदुंगाचा होणारा गजर आणि विठुनामाचा जयघोषाबरोबरच लहान-थोरांच्या दांडग्या उत्साहाने भव्यता उत्तरोत्तर वाढविली. सणसर येथील मुक्कामानंतर भल्या सकाळीच पालखी सोहळ्याने बेलवाडीच्या दिशेने प्रस्थान ठेवले. त्यानंतर भाविकांचे स्वागत, सत्कार स्वीकारत पालखी सोहळा बेलवाडीत दाखल झाला. ग्रामस्थांनी सोहळ्याचे मोठ्या उत्साहात स्वागत केले. अश्व रिंगण सोहळ्याची सुरुवात अक्षय मचाले यांच्या मानाच्या मेंढ्यांच्या रिंगणाने झाली. यानंतर टाळकरी, वीणेकरी, तुळशी वृंदावनधारक महिला, झेंडेकरी,



यांचे रिंगण पार पडले. यावेळी विठ्ठल भेटीच्या ओढीने निघालेल्या वारकऱ्यांनी वयोभान विसरून धावत या सोहळ्यात रिंगण पूर्ण केले. यावेळी सर्वांनी अलिखित शिस्तबद्ध रिंगण सोहळ्याचे अभूतपूर्व असे दर्शन घडविले. डोळ्याचे पारणे फेडणारा हा सोहळा अनुभवण्यासाठी परिसरातील भाविकही मोठ्या संख्येने हजर होते.

सकाळी ७ वाजल्यापासूनच रिंगण सोहळ्याला पहिल्या अश्व रिंगणासाठी बेलवाडी येथे 'ज्ञानोबा माउली तुकाराम' अशा जयघोषात आगमन झाले. तत्पूर्वी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते बेलवाडीतील पहिल्या मानाच्या गोल रिंगणाच्या अश्वाचे पूजन करण्यात आले. रिंगण सोहळ्यानंतर येथील हनुमान मंदिरामध्ये पालखी सोहळा विश्रांतीसाठी विसावला. यानंतर पालखी सोहळा निमगाव केतकी येथील मुक्कामी मार्गस्थ झाला. यावेळी भाजी, पिठलं, चटणी, ठेचा भाकरीचा आस्वाद घेऊन काही काळ वारकरी भाविकांनी बेलवाडीत विसावा घेतला. घरोघरी वारकरी भाविकांचा पाहुणचार करण्यात आला. वारकरी भाविकांच्या भेटीने जणू विठ्ठल दर्शनाचाच आनंद येथील ग्रामस्थांना झाल्याचे जाणवत होते.

# भाजप प्रदेशाध्यक्षपदी रवींद्र चव्हाण

## १ जुलैला घोषणा; किरण रिजिजू निरीक्षक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई :–** प्रदेश भाजपच्या अध्यक्षपदी माजी मंत्री आणि सध्याचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची निवड १ जुलै रोजी मुंबईत केली जाईल. त्यासाठी केंद्रीय भाजपने केंद्रीयमंत्री किरण रिजिजू यांची निरीक्षक म्हणून शुक्रवारी नियुक्ती केली.



### राष्ट्रीय अध्यक्ष लवकरच

भाजपच्या देशातील ५० टक्क्यांहून अधिक प्रदेशाध्यक्षांची निवड झाल्यानंतर राष्ट्रीय अध्यक्षांची निवड करण्याची पद्धत आहे. येत्या आठ-दहा दिवसांत आणखी काही राज्यांचे प्रदेशाध्यक्ष निवडले जातील.

नवीन राष्ट्रीय अध्यक्षांची निवड जुलैमध्ये होण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची बैठक ४, ५ आणि ६ जुलै रोजी दिल्लीत होणार आहे. त्यादरम्यान भाजप आणि संघ नेतृत्वात चर्चा होऊन राष्ट्रीय अध्यक्षांचे नाव ठरेल.

प्रदेशाध्यक्ष निवडीसाठी किरण रिजिजू हे ३० जून रोजी मुंबईत येतील आणि १ जुलै रोजी चव्हाण यांच्या नावाची घोषणा समारंभपूर्वक केली जाईल. चव्हाण हे सध्याचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची जागा घेतील. चव्हाण यांची जानेवारी २०२५ मध्ये प्रदेश कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती. केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शाह यांनी नांदेड येथे २६ मे रोजी झालेल्या भाजपच्या मेळाव्यात बोलताना 'भाजपचे भावी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण' असा उल्लेख केला होता.

डोंबिवलीचे आमदार असलेले ५५ वर्षीय चव्हाण हे एकनाथ शिंदे सरकारमध्ये सार्वजनिक बांधकाम मंत्री होते. गेल्यावर्षी देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश करण्यात आलेला नव्हता. तेव्हापासूनच ते नवे भाजप प्रदेशाध्यक्ष असतील असे मानले जात होते. फडणवीस यांचे निकटवर्ती अशी त्यांची ओळख आहे. पूर्वीच्या फडणवीस सरकारमध्ये ते राज्यमंत्री होते.

पक्षाच्या पद्धतीनुसार प्रदेशाध्यक्ष या पदासाठी अर्ज मागविले जातील. चव्हाण यांचा एकट्याचा अर्ज येईल चव्हाण यांचा एकट्याचा अर्ज येईल आणि नंतर त्यांच्या नावाची घोषणा मुंबईत १ जुलै रोजी होईल. त्यानंतर एक महिन्यात पक्षाचे अधिवेशन होईल आणि चव्हाण यांच्या नावावर मान्यतेची मोहोर उमटेल.

हे अधिवेशन ठाणे येथे होण्याची शक्यता आहे. बावनकुळे यांची प्रदेश भाजपच्या अध्यक्षपदी दि. १२ ऑगस्ट २०२२ रोजी नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या कार्यकाळात लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपला मोठे अपयश आले. मात्र विधानसभेला दणदणीत विजय मिळाला होता.

# जनवाद कार्यक्रम विविध विषयांचे निवेदन प्राप्त

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी साधला नागरिकांशी संवाद साधला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती–** पालकमंत्री चंद्र बावनकुळे यांच्या जनसंवाद कार्यक्रमात विविध स्थानिक समस्या सामायिक नागरिकांनी सादर केली. त्यांना नागरिकांच्या विविध समस्या, म्हणणे ऐकून त्यांचे समाधान केले.

पालक मंत्री श्री. बावनकुळे यांनी आज राज्य शांततागृह येथे समस्या मांडल्या आहेत. महिला प्रताप अडसड, आमदार राजेश, प्रवीण-पाटील, पोटाखे अतिरिक्त गोविंद दाणेज, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भट, तहसीलदार लोखंडे उपस्थित होते. जनसंवाद कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पालक यांनी उत्तर दिले, आणि समस्या शंका घेणारे नागरिक त्यांच्याशी संवाद साधला.वीज बिल, निधी पट्टे, सोडत, शेतकरी, शेतकरी आत्महत्या, घरकुल, कुल, गट, या विविध विषयांवरील पाणी पालक मंत्री श्री. बावनकुळे यांनी नागरिकांशी संवाद साधला. पालक मंत्री यांनी नागरिकांशी चर्चा केली व त्यांचे ऐकून घेतले.अनेक लोकांची समस्या समोर आली होती. श्री. बावनळे नागरिकांशी संबंधित आहेत. राज्य मोठ्याने नागरिक उपस्थित होते.

# स्वप्नं दाखवली वर्ल्ड क्लासची, नागपूरचा फुटाळा गेला वेस्ट क्लासमध्ये!

## स्वच्छता आणि देखभाल का नाही?



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नागपूर–** फुटाळा फक्त तलाव नव्हता, तो नागपूरच्या हृदयाचा ठाव होता. सकाळी चालणं, संध्याकाळच्या गप्पा, कुटुंबासोबत निवांत वेळ... पण हे सगळं विसरून महापालिकेने विकास नावाची खेळी खेळली. तलाव परिसरात साकारलेले तब्बल १६० कोटी रुपयांची विकासकामे गेले दीड वर्षापासून धूळ खात पडून गॅलरीतील आहेत. व्ह्यू बसायच्या जागा, म्युझिकल फाउंटेन, सुंदर फूटपाथ, स्ट्रीट लाइटसह सर्व सुविधा अक्षरशः पडद्याआड गेल्या आहेत. तलावाच्या काठावर कचऱ्याचे ढीग आणि खचत चाललेल्या भिंतींमुळे या परिसराची दयनीय अवस्था झाली आहे.

प्रशासन सर्वोच्च न्यायालयाने बांधकामांवर घातलेल्या बंदीचा हवाला देत देखभालीची जबाबदारी झटकत आहे.

एका याचिकेवरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने फुटाळा तलाव परिसरात नवीन बांधकामांवर बंदी घातली आहे. सध्या हा विषय न्यायालयात प्रलंबित आहे. मात्र जाणकारांच्या मते न्यायालयाचा हवाला देत प्रशासनाने तलाव परिसराकडे पाठ फिरवली आहे.

नासुप्रचा दावा आहे की, फाउंटेनचे काम पूर्ण झाले आहे. मात्र न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याने तो अद्याप सुरू करण्यात आलेला नाही. मात्र तज्ज्ञांचा दावा आहे की, फाउंटेन पूर्णपणे तयारच झालेला नाही.

पहिल्यांदा फाउंटेनची वायरिंग कीड लागून खराब झाली, नंतर पुन्हा वायरिंग करण्यात आल्याचे सांगण्यात आले, पण तरीही फाउंटेन नियमितपणे सुरू झालेला नाही.

फुटाळा तलाव परिसराच्या अनेक ठिकाणी भिंती खचत आहेत, काही भागांमध्ये भिंती कोसळल्याही आहेत. यामुळे अपघाताची शक्यता आहे. तलावाच्या आजूबाजूच्या भागांमध्ये कचऱ्याचे ढीग साचले आहेत आणि प्रचंड दुर्गंधी पसरलेली आहे.

# वारकऱ्यांसाठी ८ जुलैला मिरज-नागपूर फेरी

## पंढरपूरहून भाविकांना घेऊन येणार; भाविकांची संख्या वाढल्याने मध्य रेल्वेचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनाला जाणाऱ्या अमरावती जिल्ह्यातील वारकऱ्यांची वाढलेली संख्या बघता नवी अमरावती ते पंढरपूर अशा विशेष रेल्वेच्या चार फेऱ्या देण्यात आल्या असल्या तरी तेवढ्यानेच भागणार नाही म्हणून पंढरपूर येथून भाविकांना परत आणण्यासाठी मिरज-नागपूर या ८ जुलै रोजी आणखी एका अतिरिक्त फेरीची सुविधा मध्य रेल्वेने दिली आहे. या विशेष रेल्वेने अमरावती जिल्ह्यातील वारकऱ्यांना बडनेरा, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे स्थानकावर उतरता येणार आहे.



गाडी क्र. ०१२१३ एकेरी विशेष गाडी ही ८ जुलै रोजी मीरज येथून दु. १२.५५ वाजता निघेल व दुसऱ्या दिवशी नागपूर येथे दु. १२.२५ वाजता पोहोचेल. दरम्यान ही गाडी पंढरपूर येथे दु. ३.५५ वाजता तर बडनेरा येथे सकाळी ८.५० वाजता पोहोचेल.

मार्गात ती पंढरपूर, कुर्डूवाडी, दौंड, अहमदनगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, चाळीसगाव, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, पुलगाव, वर्धा, अजनी या स्थानकांवर थांबा घेणार आहे. या गाडीची दोन वातानुकुलीत तृतीय, १० शयनयान, ४ सामान्य द्वितीय श्रेणी, दोन द्वितीय श्रेणी अशी संरचना आहे. त्याचप्रमाणे ज्या भाविकांना काही कारणास्तव नवी अमरावती-पंढरपूर रेल्वेने सावळ्या विठ्ठलाच्या दर्शनाला जाणे शक्य होणार नाही, त्यांच्याकरिता पंढरपूरला जाण्यास गाडी क्र. ०१२०५ नागपूर-मिरज रेल्वेची सुविधा आहे. ही विशेष रेल्वे ४ व ५ जुलै रोजी बडनेराहून दुपारी १२ वाजताच्या सुमारास निघणार असल्यामुळे सुविधाजनक आहे. गाडी क्र. ०१२०६ मिरज-नागपूरने ५ व ६ जुलै रोजी परतीचा प्रवास करता येणार आहे. ही विशेष रेल्वे पंढरपूर स्थानकावर थांबा घेणार आहे, असे कळवण्यात आले आहे. आषाढी एकादशीनिमित्त अमरावतीकर भाविकांना विठू माउलींचे दर्शन घेता यावे यासाठी मध्य रेल्वेद्वारे अकोली येथील नवी अमरावती रेल्वे स्थानक ते पंढरपूर विशेष रेल्वेची सुविधा दिली आहे. दोन फेऱ्या भाविकांना पंढरपूर येथे नेण्यासाठी तर दोन फेऱ्या पंढरपूरहून परत आणण्यासाठी अशा एकूण चार फेऱ्या ही विशेष रेल्वे करणार आहे. गाडी क्र. ०१११९ पंढरपूर विशेष रेल्वे नवी अमरावतीहून २ व ५ जुलै रोजी दु. २.४० वाजता वारकऱ्यांना घेऊन निघेल. त्यानंतर १८ तास ३० मिनिटांचा प्रवास करून दुसऱ्या दिवशी सकाळी ९.१० वाजता पंढरपूर येथे पोहोचेल. गाडी क्र. ०११२० ही पंढरपूरहून ३ व ६ जुलै रोजी सायं. ७.३० वाजता निघेल व नवी अमरावतीत दुसऱ्या दिवशी दुपारी १२.५० वाजता पोहोचेल. दोन तृतीय वातानुकुलित, १० शयनयान, ४ सामान्य द्वितीय श्रेणी, २ सामान्य द्वितीय श्रेणी केवळ बैठक आणि सामानासह गार्ड ब्रेक व्हॅन अशी या विशेष रेल्वेची संरचना आहे.



दैनिक दिव्य मराठीचे अमरावती ब्युरो चीफ अनुप गाडगे यांना महाराष्ट्र शासनाचा लोकनायक बापूजी अणे पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा आज पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जेष्ठ पत्रकार संजय बनारसे,युसीएन न्यूज चे जिल्हा प्रतिनिधी अरुण जोशी,अमरावती मधील प्रसिद्ध उद्योजक अमोल चवणे, प्रफुल्ल घवळे, मंगेश तायडे आदी उपस्थित होते.

# वणी बेलखेडा येथे शेतकऱ्यांचे बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू

## १५ वर्षांत ८५ जनावरे चोरीला गेली तरी पोलिसांची अद्याप कारवाई नाही




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८वणी बेलखेड**

वणी बेलखेडा गावात २०१० पासून आजवर २१ शेतकऱ्यांची ८५ जनावरे चोरीला गेली असून, अद्याप ब्राह्मणवाडा थडी पोलिस स्टेशनने कोणतीही कारवाई केली नसल्यामुळे वणी (बेलखेडा ) येथील मुकेश अलोने यांच्यासह गावकऱ्यांनी तत्काळ कारवाई करून न्याय मिळावा या मागणीसाठी बेमुदत अन्नत्याग आंदोलन शुक्रवार २७ जून पासून वणी येथील ग्राम पंचायत कार्यालयासमोर सुरू केले आहे.

तालुक्यातील ब्राम्हणवाडा थडी पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या वणी बेळखेडा या गावात २०१० पासून शेतकऱ्यांच्या जनावरांची मोठ्या प्रमाणात चोरी होत असून, यामध्ये बैलजोडी, गायी, शेळी , म्हशी इत्यादी सर्व प्रकारच्या एकूण ८५ जनावरांची आजपर्यंत चोरी झाली आहे. या चोरीच्या प्रकारांमुळे शेतकऱ्यांना आजवर जबर आर्थिक फटका बसला आहे. या सर्व प्रकारची माहीती गावकऱ्यांनी ब्राम्हणवाडा पोलीस स्टेशनला वारंवार देऊनही पोलीस स्टेशनने कोणतीही कारवाई केली नाही. कोणत्याही प्रकारची चौकशी केलेली नाही असे उपोषणकर्त्यांचे म्हणणे आहे.अलिकडे १ मे रोजी मुकेश अलोणे यांच्या गोट फार्म मधील ८ बकऱ्या चोरीला गेल्या असून, त्यांचे दीड लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. या घटनेबाबत पोलिस स्टेशनला माहिती दिल्यानंतरही आजवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. या घटनेबाबत गावकऱ्यांनी खा.डॉ. अनिल बोंडे यांना यांच्याकडे तक्रार दिली असता त्यांनी पोलिस अधीक्षक , अमरावती ग्रामीण यांना कारवाई करण्यास सांगितले.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयात 'रिसर्च मेथडॉलॉजी' वर STTP चे आयोजन




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावती येथील अप्लाइड सायन्स व ह्युम्यानिटी विभागाच्या वतीने, तसेच आयएसटीइ (ISTE) च्या संयुक्त विद्यमाने 'रिसर्च मेथडॉलॉजी' या विषयावर एसटीटीपी (Short Term Training Program - STTP) १ जुलै ते ६ जुलै २०२५ या कालावधीत संपूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात आयोजित करण्यात आला आहे.

हा प्रशिक्षण कार्यक्रम देशभरातील प्राध्यापक, संशोधक आणि संशोधनामध्ये रूची असणाऱ्या शैक्षणिक कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आला असून, संशोधन क्षेत्रात कार्यरत असलेल्या किंवा नव्याने संशोधन सुरु करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अभ्यासक्रमामध्ये विविध संशोधन पद्धती, डेटा संकलन तंत्र, विश्लेषण पद्धती, नैतिकता व शैक्षणिक लेखन कौशल्य यांचा समावेश असणार आहे.

या अभ्यासक्रमासाठी केवळ ११८/- इतका अत्यल्प नोंदणी शुल्क ठेवण्यात आला आहे, जेणेकरून अधिकाधिक सहभागी प्राध्यापक याचा लाभ घेऊ शकतील. इच्छुकांनी खालील लिंकवरून ऑनलाइन नोंदणी करावी:

https://forms.gle/T4UFvK2FBo7ViijG-

असे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक डॉ. एन. आर. ठाकरे,समन्वयक डॉ. एस. ए. भोजने व डॉ. जी. पी. देशपांडे यांनी केले आहे.

# ताडोबातील व्याघ्रदर्शन महागले : गाभा क्षेत्रात पर्यटनासाठी ८ हजार ८०० रुपये मोजावे लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८चंद्रपूर**



व्याघ्रप्रकल्पातील सफारी सर्वसामान्यांसाठी कधीच परवडणारी नव्हती. त्यानंतरही केवळ व्याघ्रदर्शनासाठी म्हणून कसेबसे पैसे जमवून हे सर्वसामान्य नागरिक ताडोबात येत होते. मात्र, आता पुन्हा ही सफारी महागली आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पातील बफरच नाही तर गाभा क्षेत्रातही सफारी करणाऱ्या पर्यटकांना आता अतिरिक्त पैसे मोजावे लागणार आहेत. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पातील पर्यटनाच्या नव्या दरपत्रकानुसार आता आहेत. तर सुटीच्या दिवशी म्हणजेच शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी १२ हजार ८०० रुपये सफारीसाठी मोजावे लागणार आहेत. सफारीच्या एक ते ५९ दिवसाआधी पर्यटनासाठी नोंदणी केल्यास आठवड्याच्या दिवशी पाच हजार ८०० रुपये आणि आठवड्याच्या शेवटी सहा हजार ८०० रुपये इतका खर्च येणार आहे. येत्या एक जुलैपासून ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील पर्यटन तीन महिने बंद असणार आहे.

# लेआऊट, फार्म हाऊस आणि मर्सिडीजवाल्यांना कर्जमाफी नाही

## खऱ्या गरजू शेतकऱ्यांनाच मिळणार लाभ, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी स्पष्टच सांगितले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

लेआऊट, फार्म हाऊस आणि मर्सिडीजवाल्यांना कर्जमाफी नाही: खऱ्या गरजू शेतकऱ्यांनाच मिळणार लाभ, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी स्पष्टच सांगितले



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अर्थमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय योग्यवेळी घेण्यात येणार असल्याचे सांगितले. आता महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठे विधान केले आहे. ले-आऊटवाल्यांना, फार्म हाऊस वाल्यांना आणि कर्ज काढून मर्सिडीज घेऊन फिरणाऱ्यांना कर्जमाफी मिळणार नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे. अमरावतीच्या कौडण्यापूर येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, आपल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने लाडक्या बहिणींसाठी जो महिना १५०० रुपये सुरू केला होता, तो पुढच्या काळात लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार आहोत. आम्ही शेतकऱ्यांना शब्द दिला होता की, शेतकऱ्यांना पुढील ५ वर्षे शेतात वीजेचा बिल येणार नाही. तसेच, आमच्या सरकारने सांगितले की, खऱ्या खऱ्या गरजू शेतकऱ्यांना कर्जमाफी आम्ही देणार आहोत.

पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शेतीवर कर्ज काढून ज्यांनी मर्सिडीज घेतल्या, ज्यांचे लेआऊट आहेत, फॉर्म हाऊससाठी कर्ज घेतलेल्यांना कर्जमाफी भेटणार नाही. धन दांडग्याना कर्जमाफी नको, ज्यांना गरज आहे त्यांनाच कर्जमाफी मिळायला हवी. कर्जमाफीसाठी उच्चस्तरीय समिती तयार होत आहे, अधिवेशन काळात ती समिती घोषित करू, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# साहेब, या रस्त्याने जायचे कसे तुम्हीच सांगा; शेतकऱ्यांचा अधिकाऱ्यांना सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८ चांदुर रेल्वे**

चांदूर रेल्वे तालुक्यातील भिलटेक - कळमजापूरच्या रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे. अशातच कळमजापूर जवळ या रस्त्यालगत कालव्याचे कामे झाल्यामुळे त्या ठिकाणचा रस्ता पूर्णत: खराब झाला असून, पायी चालणेही कठिण झाले आहे. त्यामुळे या रस्त्याने जायचे कसे, असा सवाल आता कळमजापूरचे शेतकरी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारत आहेत. भिलटेक ते कळमजापूर हा डांबरी रस्ता अतिशय खराब झाला असून, अनेक ठिकाणी रस्ता उखडला आहे. तसेच या रस्त्यालगत एका कालव्याचे काम काही महिन्यांपूर्वी झाले आहे. कालवा बनवला त्या ठिकाणच्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, मोठ्या प्रमाणात माती रस्त्यावर



जमून पावसामुळे रस्त्यात चिखल झाला आहे. त्यामुळे येथून पायी चालणेही कठिण झाले आहे. रस्त्याच्या बिकट स्थितीमुळे शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. सध्या शेतात पेरणी, फवारणीची कामे सुरू असून, शेतकऱ्यांना शेतात जाताना कसरत करावी लागत आहे. त्यामुळे रस्ता दुरुस्तीची मागणी होत आहे.

# खेळाडूंच्या अप्रतिम कामगिरीमुळे विद्यापीठाचा नावलौकिक- कुलगुरू

## विद्यापीठातर्फे विविध क्रीडा स्पर्धेत प्राविण्यप्राप्त खेळाडू, प्रशिक्षक यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

विद्यापीठाच्या खेळाडूंनी दक्षिण-पश्चिम विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत अप्रतिम कामगिरी करून विद्यापीठाला विविध पदके व पारितोषिके मिळवून दिली आहेत. या सर्व खेळाडूंनी विद्यापीठाचा नावलौकिक देशपातळीवर पोहोचवला असून, त्यात गौरवास्पद भर घातल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी विद्यापीठातील खेळाडू, प्रशिक्षक, व्यवस्थापकांच्या सत्कारप्रसंगी शुक्रवारी केले.

विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने २०२४-२५ मधील दक्षिण-पश्चिम विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये प्राविण्यप्राप्त चमूतील खेळाडूंना रोख पुरस्कार, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र तसेच चमू



व्यवस्थापक आणि प्रशिक्षक यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. सुभाष गावंडे, डॉ. विकास टोणे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. तनुजा राऊत उपस्थित होते.

पदक मिळवणे सोपे नाही. पारंपरिक विद्यापीठांसह खासगी विद्यापीठातील खेळाडूही या स्पर्धांमध्ये सहभागी होतात. खासगी विद्यापीठे अद्ययावत सुविधा खेळाडूंना पुरवतात, त्या तुलनेत आपल्या खेळाडूंना कमी सुविधा असतात. तरी खेळाडूंसाठी विविध सोयी-सवलतीमध्ये विद्यापीठाने वाढ केली आहे. रेल्वेतून एसी कोचमध्ये प्रवासाची सुविधा विद्यापीठाने उपलब्ध करून दिली असून, भत्त्यामध्येही वाढ केल्याचे कुलगुरूंनी सांगितले.

सर्व खेळाडू, चमू व्यवस्थापक व प्रशिक्षकांनी अतिशय मेहनत घेतल्यामुळे अनेक पारितोषिके मिळवून विद्यापीठाच्या नावलौकिकात राष्ट्रीय स्तरावर भर घातली आहे. त्या सर्वांचे विद्यापीठाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. भविष्यात आमचे खेळाडू आणखी पदके व पारितोषिके प्राप्त करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रम व कार्यशाळा आयोजनामागील भूमिका क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी मांडली. सूत्रसंचालन डॉ. रूपाली टोणे व संतोष वानखडे यांनी केले, तर आभार डॉ. चिंचमलातपुरे यांनी मानले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे तसेच शारीरिक शिक्षण मंडळाचे पदाधिकारी, पाचही जिल्ह्यांतील क्रीडा संचालक, पालक उपस्थित होते.

# पेरणी करताना दुर्दैवी घटना; ट्रॅक्टर थेट विहिरीत कोसळला, चालकाचा बुडून मृत्यू

## वऱ्हा गावच्या पंचक्रोशीतल्या शेतशिवारातील दुर्दैवी घटना





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८तिवसा**

तिवसा तालुक्यातील वऱ्हा येथील शेतकरी संजय देविदास भाकरे (वय ४६) यांचा दुबार पेरणी दरम्यान ट्रॅक्टरसह विहिरीत कोसळून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दिनांक २८ जून रोजी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास मौजा जावरा शेतशिवारात घडली. या भीषण अपघाताने वऱ्हा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.संजय भाकरे हे मौजा जावरा येथील रवींद्र नारायण वाघाडे यांच्या ४ एकर शेतात सोयाबीनची दुबार पेरणी करण्यासाठी स्वतःच्या ट्रॅक्टरसह गेले होते. पेरणी सुरू असताना ट्रॅक्टरचे अचानक नियंत्रण सुटले आणि ट्रॅक्टरसह संजय भाकरे शेजारील खोल विहिरीत कोसळले.घटनेच्या वेळी शेतात आठ ते नऊ महिला मजूर उपस्थित होत्या. त्यांनी घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार होत, तत्काळ संजय भाकरे यांना वाचविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या अंगावरील साड्यांचा दोर बनवून मदतीचा हात पुढे केला, मात्र हे प्रयत्न दुर्दैवाने अयशस्वी ठरले.घटनेनंतर काही वेळातच शेतात मोठी गर्दी झाली. तिवसा येथून अग्निशामक दल आणि क्रेनची व्यवस्था करण्यात आली. क्रेनच्या सहाय्याने ट्रॅक्टर बाहेर काढण्यात आला. परंतु संजय भाकरे यांना वाचवणे शक्य झाले नाही. त्यांच्या मृत्यूने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.संजय भाकरे यांच्या पश्चात दोन भाऊ, पंधरा वर्षांचा मुलगा आणि अकरा वर्षांची मुलगी असा परिवार असून संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.घटनेची माहिती मिळताच कुऱ्हा पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तात्काळ पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी तिवसा उपजिल्हा रुग्णालयात हलवला. पुढील तपास सुरु आहे.


**विहीर न दिसल्याने झाला घात**

दरम्यान रवींद्र वाघाडे यांच्या शेतात विहीर खोदकाम करण्यात आले आहे. विहिरीला चांगल्या प्रकारे पाणी देखील लागले आहे. मात्र विहिरीच्या आजूबाजूला पक्के बांधकाम करण्याचे काम बाकी आहे. याच शेतात ट्रॅक्टरद्वारे पेरणी सुरु होती. मात्र चालक संजय यांना विहीर नजरेस पडली नाही. यात अचानक ट्रॅक्टर विहिरीत कोसळला. विहिरीत पाणी असल्याने चालकाला बाहेर निघता न आल्याने बुडून मृत्यू झाला.

# एसटी बस अनियंत्रित होऊन झाडाला धडकली

## चांदूर रेल्वे तालुक्यातील घटना, सात प्रवासी जखमी







**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८चांदुर रेल्वे**

अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे एसटी आगाराची बस बेलोरा या गावी जात असतांना चिंधादेवी फाट्याजवळ अनियंत्रित होऊन निंबाच्या झाडाला धडकल्याची घटना शुक्रवारी रात्री दरम्यान घडली.एम एच ४० वाय ५३८८ ही बस शुक्रवारी अमरावती कडे येत असताना अचानक ही बस निंबाच्या झाडावर जाऊनयामध्ये ड्रायव्हर, कंडक्टर एकूण सात लोक गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. सातही जखमींना चांदूर रेल्वे वरून अमरावती रेफर करण्यात आले. तर बस मधील इतर काही प्रवासी किरकोळ जखमी आहे. या घटनेत कंडक्टर हा गंभीर जखमी झाला असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. बस समोर रोही आडवा आल्याने सदर अपघात झाल्याचे बोलल्या जात आहे.

# स्वच्छ सर्वेक्षणात आता एक हजार गुणांचे मूल्यांकन

## नव्या पद्धतीत मानसिकतेतील बदल आला १०० गुण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**


स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत केंद्र शासनाच्यावतीने स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण उपक्रमास सुरुवात झाली. आता या सर्वेक्षणासाठी एकूण एक हजार गुणांची मूल्यांकन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. ज्यामध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन १२० गुण, ग्रामस्थांचा प्रतिसाद व मानसिकतेतील बदल १०० गुण, स्वच्छता सुविधांचा वापर २४० गुण व प्रत्यक्ष निरीक्षण व प्रश्नावली ५४० गुण असे एकूण एक हजार गुणाचे मूल्यांकन राहणार आहे. केंद्रीय पथकाच्या माध्यमातून तपासणी केली जाणार असून निकष अधिक कठोर करण्यात आले.

स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ चा राज्यस्तरीय प्रारंभ झाला. आता जिल्हास्तरावर या अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामध्ये गावांतील स्वच्छतेची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार असून त्यामध्ये वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांचा वापर, दृष्यमान स्वच्छता, ओला-सुका कचऱ्याचे वर्गीकरण, घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन, खतखड्डे, प्लास्टिक संकलन व त्याचे व्यवस्थापनाची पाहणी करण्यात येणार आहे. यादरम्यान घरोघरी भेट देऊन नागरिकांच्या स्वच्छतेविषयक सवयी, शौचालय वापर, कचरा व्यवस्थापन, हात धुण्याच्या सवयी, तसेच परिसरातील एकूण स्वच्छतेचा आढावा घेतला जाईल.

यासोबतच शाळा, अंगणवाडी, बाजारपेठा, धार्मिक स्थळे आणि सार्वजनिक शौचालये या सारख्या सार्वजनिक संस्थांमध्ये स्वच्छता राखलेली आहे का? याचीही पडताळणी केली जाणार आहे. स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण हा केवळ स्वच्छता विभागाशी संबंधित नसून त्यामध्ये पंचायत विभाग, शिक्षण, आरोग्य, एकात्मिक बाल विकास विभाग, पाणी पुरवठा या विभागांचा समावेश आहे. त्यामुळे केंद्रीय पथकाच्या माध्यमातून गावात तपासणी होत असतांना सर्व विभागांनी आपापसात समन्वय ठेवणे अपेक्षित आहे.

# ठाकरे बंधूंचा पाच तारखेचा मोर्चा मतदारांची दिशाभूल करणारा

## आमदार रवी राणाची ठाकरे बंधूंच्या मोर्चा वर टीका...



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

हिंदी भाषा सक्तीला विरोध म्हणून मराठी भाषाची सक्ती महाराष्ट्रात असली पाहिजे यासाठी राज ठाकरे व उद्धव ठाकरे एकत्रित पाच तारखेला मोर्चा काढणार आहे, या मोर्चावर बडनेराचे आमदार रवी राणा यांनी टीका केली, तसेच उद्धव ठाकरे यांच्यावर रवी राणांनी हल्लाबोल करत मराठी माणसाविषयी प्रेम आता येत आहे, महाराष्ट्रातील प्रत्येक माणूस मराठी माणसासोबत उभा आहे, त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी ही नौटंकी थांबवावी.. तर मुंबई महानगरपालिका निवडणूक डोळ्यासमोर ठेवून मराठीचा मुद्दा समोर केला जात आहे, उद्धव ठाकरे यांना वाटते की आमचा झेंडा मुंबई महानगरपालिकेवर फडकला पाहिजे, तर मराठीचा कोणी महाराष्ट्रात विरोध करत नाही तर पाच तारखेचा मोर्चा मतदारांची दिशाभूल करणारा मोर्चा आहे अशी टीका रवी राणा यांनी केली, मुख्यमंत्री बनण्यासाठी काँग्रेसच्या दरबारात उद्धव ठाकरे गेले असही रवी राणा यांनी टीका केली

# पालकमंत्र्यांच्या हस्ते १२ भूमिहीन लाभार्थ्यांना शेतजमिनीचे वाटप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत जिल्ह्यातील १२ भूमिहीन लाभार्थ्यांना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते शेतजमिनीच्या पट्ट्यांचे वितरण करण्यात आले.

शासकीय विश्रामगृह येथे पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी स्वतः शेतजमीन पट्टे व आदेशाचे वितरण केले. आमदार प्रताप अडसड, आमदार राजेश वानखडे, प्रवीण पोटे-पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दाणेज, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, तहसीलदार विजय लोखंडे यावेळी उपस्थित होते.

मोर्शी तालुक्यातील मौजा शिरलस येथील श्रीमती शिला वानखडे, अशोक वानखडे, बाळु खडसे व मौजा नेरपिंगळाई भाग २ येथील अमोल डाखोडे यांची कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेसाठी निवड करण्यात आली. तसेच नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील मौजा माहुली चोर येथील माला इंगोले, रेखा कांबळे, मौजा येवती येथील जितेंद्र घोडेस्वार, शिवानंद मेश्राम, संजय चिमणकर, रमेश मुनेश्वर, मंगेश लोखंडे व अमर बनसोड यांचीही कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेसाठी निवड करण्यात आली.लाभार्थ्यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व वंचित दुर्बल घटकांतील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी विविध लोककल्याणकारी योजना राबविल्या जातात. यापैकी कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना ही महत्त्वपूर्ण योजना आहे. या योजनेचा मुख्य उद्देश १८ ते ६० वयोगटातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील दारिद्र्यरेषेखालील पिढ्यानपिढ्या भूमिहीन असलेल्या शेतमजूर कुटुंबांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देणे, त्यांचे राहणीमान उंचावणे आणि मजुरीवरील त्यांचे अवलंबित्व कमी करून त्यांना कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन मिळवून देणे हा आहे. या योजनेअंतर्गत अशा भूमिहीन शेतमजूरांना त्यांची शेतमालक होण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी १०० टक्के अनुदानावर ४ एकर कोरडवाहू किंवा २ एकर बागायती शेतजमीन कसण्याकरिता उपलब्ध करून दिल्या जाते.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने सन २०२५-२६ या वर्षात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गौरवशाली अभियान राज्यभर राबविण्यात येत आहे. याच अभियानाअंतर्गत समाजातील वंचित, दुर्बल घटकांना प्रत्यक्ष लाभ देण्यासाठी, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन शेतमजूर असलेल्या लाभार्थ्यांना शेतजमीन पट्टे व आदेशाचे वितरण यावेळी करण्यात आले.या योजनेअंतर्गत शेतमालक म्हणून निवड झालेल्या भूमिहीन लाभार्थी, तसेच विधवा व परित्यक्ता महिलांशी पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी संवाद साधला.

# जमिनीच्या तुकड्यासाठी काकू अन् चुलत भावाचे केले कुऱ्हाडीने तुकडे; वर्धा जिल्ह्यातील क्रूर घटना




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८वर्धा**

वर्धा जिल्ह्यातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. (थरीवहर) शेतीच्या वादावरून झालेल्या वादात चुलत भावाने आपल्या काकू आणि चुलत भावाची कुऱ्हाडीने हत्या केली आहे. त्यानंतर आरोपीने विष प्राशन करून आत्महत्या केली. गेल्या काही दिवसांपासून शेतीच्या धुऱ्याच्या वाटपावरून तसंच, ठोक्याने शेती लावण्यावरून वाद सुरू होता.

या दुहेरी खून आणि आत्महत्येच्या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेत मृत झालेल्यांमध्ये साधना सुभाष मोहिजे (वय ५५) आणि त्यांचा मुलगा नितीन सुभाष मोहिजे (वय २७) यांचा समावेश आहे. या दोघांची हत्या महेंद्र मोहिजे या त्यांच्या पुतण्याने केली. पोलीस तपासानुसार, गेल्या काही दिवसांपासून महेंद्र आणि नितीन यांच्यामध्ये शेतीच्या धुऱ्याच्या वाटपावरून वाद सुरू होता. गावातील काही जमिनी ठेक्याने लावण्यावरूनही तणाव वाढला होता.

अखेर तो वाद इतका टोकाला गेला की, महेंद्र मोहिजेने संतप्त अवस्थेत नितीन आणि त्याची आई साधना यांच्यावर कुऱ्हाडीने हल्ला करत त्यांचा जागीच खून केला. या खुनाच्या घटनेनंतर महेंद्रने स्वतः विष प्राशन केलं आणि काही वेळातच त्याचाही मृत्यू झाला. ही घटना समजताच अल्लीपूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस अधीक्षक अनुराग जैन आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक राहुल चौहान यांनीही घटनास्थळी भेट दिली आणि संपूर्ण घटनेचा आढावा घेतला.

मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी वर्धा जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी महेंद्र मोहिजे हा साधना मोहिजे यांचा पुतण्या होता, तर नितीन मोहिजे त्याचा चुलत भाऊ होता. शेतीच्या मालकीहक्कावरून आणि उत्पन्नाच्या वाटपावरून अनेक दिवसांपासून हे वाद सुरू होते.सध्या पोलीस पुढील तपास करत असून, शेजारी आणि नातेवाईकांचे जबाब नोंदवले जात आहेत.

# ठाकरे बंधूंच्या मोर्चात राष्ट्रवादी अजित पवार गट सहभागी होणार नाही - तटकरे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

प्रसारमाध्यमांशी बोलताना सुनील तटकरे यांनी सांगितले की, ५ जुलै रोजी काढण्यात येणाऱ्या मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कोणताच नेता सहभागी होणार नाही. हा विरोधी पक्षाने काढलेला मोर्चा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला या संदर्भात काही भावना व्यक्त करायच्या असतील तर आम्ही मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन मार्ग काढण्याचा प्रयत्न करू, असे सुनील तटकरे यांनी म्हटले आहे. ठाकरे बंधूंच्या मोर्चाला शरद पवार गटाने पाठिंबा दिला आहे. यावर बोलताना सुनील तटकरे म्हणाले की, शरद पवार यांनी मोर्चाला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चिन्ह नाहीत. मला याबाबत काहीच बोलण्याचे कारण नसल्याचे हे ते यावेळी म्हणाले.